③

शैक्षणिक वर्ष २००६-०७ करिता औषधनिर्माणशास्त्र या
शाखेचे पदविका अभ्यासक्रम राबविण्यास नवीन संस्थांना
मान्यता देण्याबाबत .....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- मान्यता-२००६/(१५२/०६)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- 3 ऑगस्ट, २००६.

संदर्भ :-
१. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.३३८२/११८३६/(१९०)/तांशि - १अ, दिनांक २१ मे, १९८३.
२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र जीईसी २०९७/(१३८/९७)/तांशि-१, दि. १९ ऑगस्ट, १९९८.
३. शासन पत्र क्र. मान्यता २००५/(८८१/०५)/तांशि-६ दि.३ एप्रिल, २००६
४. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/ पदविका प्रस्ताव/२००६/२०९ दि.३० जून,०६ अन्वये सादर झालेला राज्यस्तरीय समितीच्या दि.२७.६.२००६ रोजी झालेल्या बैठकीचा अहवाल
५.शासनाचे पत्र क्र. मान्यता-२००६/ (१२७/०६)/ तांशि-६, दि.१७ जुले, २००६
६.अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र.एफ.२२- २५३४ /२००६. दि.२७.७.२००६.

शासन निर्णय :- सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र या शाखांचे पदवीका अभ्यासक्रम राबविण्यासाठी नवीन संस्थांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. उपरोक्त संदर्भ -३ मधील शासन मान्यतेस अनुसरुन तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत देण्यात आलेल्या जाहिरातीसंदर्भात ज्या विविध संस्थांनी सदरहू अभ्यासक्रमांसाठी नवीन संस्था सुरु करण्यासाठी अर्ज केले होते त्या अर्जांची छाननी करुन सदर छाननी अहवाल उपरोक्त संदर्भ - ४ मध्ये नमूद केलेल्या राज्यस्तरीय समितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रकरणी दि.२७.६.२००६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत नवीन संस्थांबावत समितीने केलेल्या शिफारशी संदर्भ -५ मधील पत्रानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने राज्यस्तरीय समितीच्या शिफारसी विचारात घेऊन संदर्भ - ६ मधील पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार खाली नमूद केल्याप्रमाणे **वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटी, एसडी पाटील नगर,उरण इस्लामपूर, ता.वाळवा,जि.सांगली - ४१५ ४०९ द्वारा संचलित एस डी पाटील इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, द्वारा एसडी पाटील नगर, उरण इस्लामपूर, ता.वाळवा,जि.सांगली** या संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ. क्र. | पदविका अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | अभ्यासक्रमाचा कालावधी | आवश्यक न्यूनतम शैक्षणिक अर्हता | मान्यतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | औषधनिर्माणशास्त्र | ६० | २ वर्षे | १०+२ | सन २००६-०७ |

निम्न निर्देशित अटी व शर्ती मान्य असल्यासंबंधी तथा अन्य औपचारिक बाबीसंबंधात मान्यताप्राप्त संस्थांनी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेशी करारनामा करणे बंधनकारक असून संचालक, तंत्रशिक्षण यांनी संबंधित संस्थांत आवश्यक शिक्षक वर्ग नियुक्त केल्याची व या संस्थांत ग्रंथालय तथा प्रयोगशाळा पूर्णपणे कार्यान्वीत झाल्याची खात्री करावी व त्या नंतर सदर संस्थात प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करून अशा मान्यताप्राप्त संस्थांची अद्ययावत यादी तयार करावी.

- उपरोक्त संदर्भ -१ मधील शासन निर्णयान्वये विना अनुदानित तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती संबंधित संस्थेस बंधनकारक असतील.
- उपरोक्त संदर्भ -२ मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार किमान ५ वर्षे कालावधीसाठी आवश्यक मुदतठेवीची रक्कम संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण यांच्या संयुक्त खात्यात जमा करावी लागेल.
- शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून यापुढे विहीत करण्यात येणाऱ्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भाधिन पत्रात व त्या पत्रासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.
- सदर पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता आवश्यक राहील.
- सदर संस्थांनी पुढील शैक्षणिक वर्षात फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम-१२ मधिल तरतूदीनुसार फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधन कारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)
(अ.गो.खडपकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये
३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई.
४. संबंधीत संस्था

**प्रत माहितीसाठी**

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कोम्प्लेक्स, आय.पी. इस्टेट, नवी दिल्ली - ११० ००२.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल अॅश्युरन्स बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई -२०.
३. निवड नस्ती / तांशि -६